ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम

गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक १६ • मंगळवार दि.६ ऑक्टोंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत ७ मोठे निर्णय

# वडार समाजाला दिलासा,पोलीसांना शौर्य पदकासह विद्यार्थ्यांच्या अनुदानात वाढ

मुंबई/प्रतिनिधी-राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध समाजघटक, पोलीस अधिकारी-कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. वडार समाजाच्या पारंपरिक दगडफोडी व उत्खनन व्यवसायासाठी गौण खनिजांच्या स्वामित्वधनात (रॉयल्टी) वाढीव सवलत देण्यास मंजुरी देण्यात आली असून वार्षिक उत्खननाची मर्यादा २०० ब्रासवरून ५०० ब्रास करण्यात येणार आहे. याशिवाय पोलीस दलातील साहसी कामगिरीसाठी मुख्यमंत्री शौर्य पदक, पोलीस कोठडीतील मृत्यूच्या प्रकरणात नुकसानभरपाईचे धोरण आणि अनुसूचित जाती-जमातींच्या विद्यार्थ्यांच्या भत्त्यांत वाढ करण्याचे निर्णय घेण्यात आले.

**वडार समाजासाठी नियमात सुधारणा**

वडार समाजाच्या पारंपरिक दगडफोडी व उत्खनन व्यवसायाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढणे) नियम, १९६८ मध्ये सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली. यानुसार वार्षिक उत्खननाची मर्यादा २०० ब्रासवरून ५०० ब्रास करण्यात येणार आहे. तसेच गौण खनिज स्वामित्वधनासाठी वाढीव सवलत देण्यात येणार आहे.

**मुख्यमंत्री शौर्य पदक जाहीर**

कर्तव्य बजावताना जीवाची पर्वा न करता जोखमीची कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना मुख्यमंत्री शौर्य पदक देण्यात येणार आहे. पदकासोबत ५० हजार रुपयांचे रोख पारितोषिक आणि प्रशस्तीपत्र दिले जाणार आहे. निवडीसाठी त्रिस्तरीय समित्यांची रचना करण्यात येणार असून, यावर्षी १ जानेवारी २०२६ पासूनची कामगिरी विचारात घेतली जाणार आहे. दरवर्षी १ मे या महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला पदकांची घोषणा करण्यात येईल. मुख्यमंत्री यांच्या हस्ते पदक प्रदान करण्यात येणार आहे.

**उच्च शिक्षणातील संशोधनाला चालना**

उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आणि संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी सी.एम. सृष्टी योजना राबविण्यास मंजुरी देण्यात आली. राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय उच्च व तंत्रशिक्षण संस्था, शासकीय तंत्रनिकेतने तसेच रसायन तंत्रज्ञान संस्था, मुंबई, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे-रायगड यांच्या माध्यमातून ही योजना राबविण्यात येणार आहे.

**पोलीस कोठडीतील मृत्यूला नुकसान भरपाई**

पोलीस कोठडीत असताना अनैसर्गिक मृत्यू झाल्यास मृताच्या कायदेशीर वारसांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळावे, यासाठी सर्वसमावेशक नुकसानभरपाई धोरणास मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे अशा घटनांमध्ये मृतांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत मिळण्याचा मार्ग सुकर होणार आहे.

**वसतिगृह कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ**

सामाजिक न्याय विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित वसतिगृहांतील कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्यास मंजुरी देण्यात आली. अधीक्षक, स्वयंपाकी, मदतनीस आणि चौकीदार यांच्या मानधनात भरीव वाढ होणार असून राज्यातील सुमारे २ हजार ३८८ अनुदानित वसतिगृहांतील कर्मचाऱ्यांना त्याचा लाभ मिळणार आहे.

**स्वाधार योजनेचे अनुदान वाढणार**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या अनुदानात वाढ करण्यास मंजुरी देण्यात आली. शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी पात्र असूनही प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळतो. अकरावी, बारावी तसेच बारावीनंतरच्या व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांच्या भोजन, निवास आणि शैक्षणिक सुविधांसाठी मिळणाऱ्या भत्त्यात वाढ करण्यात येणार आहे.

**आदिवासी विद्यार्थ्यांच्या भत्त्यात सुधारणा**

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठीच्या पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेतील भत्त्यांमध्ये सुधारणा करण्यासही मंजुरी देण्यात आली. त्यामुळे उच्च शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य मिळणार आहे.

# अपात्रतेपूर्वीच निवडणूक आयोगाचा निर्णय शक्य

## शिवसेना पक्ष-चिन्हावर शिंदे गटाचा जोरदार युक्तिवाद

नवी दिल्ली:निवडणूक आयोगाला पक्षातील फुटीच्या परिस्थितीत कोणता गट मूळ राजकीय पक्ष आहे, हे ठरविण्याचा अधिकार असल्याचे कौल यांनी न्यायालयात मांडले. तसेच आमदारांच्या अपात्रतेवरील निर्णय होईपर्यंत निवडणूक आयोगाची कार्यवाही थांबविता येणार नाही, असा युक्तिवाद शिंदे गटाचे ज्येष्ठ विधिज्ञ निरज कौल यांनी आज सर्वोच्च न्यायालयात केला.




शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबत उद्धव ठाकरे गटाने निवडणूक आयोगाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. या निर्णयाद्वारे निवडणूक आयोगाने शिवसेना हे पक्षनाव आणि धनुष्यबाण चिन्ह एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील गटाला दिले होते. ठाकरे गटाचा युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर आता शिंदे गटाकडून बाजू मांडली जात आहे. कौल यांनी आपल्या युक्तिवादात निवडणूक आयोगाच्या अधिकारांवर विशेष भर दिला. निवडणूक आयोगाने या प्रकरणात उपलब्ध असलेल्या विविध चाचण्यांचा विचार करून निर्णय घेतला असून, कोणती चाचणी वापरायची याचा अधिकार आयोगाला असल्याचे त्यांनी सांगितले. सादिक अली प्रकरणाचा संदर्भ देत विधिमंडळातील बहुमत हीदेखील पान ४ वर

# अखेर दुष्काळग्रस्त तालुक्यातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कातून सवलत

## स्वारातीम विद्यापीठाचा निर्णय

नांदेड/प्रतिनिधी-राज्यातील दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेऊन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने दुष्काळग्रस्त तालुक्यांतील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना हिवाळी-परीक्षेच्या परीक्षा शुल्कातून सवलत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली १ ऑक्टोबर रोजी झालेल्या ऑनलाइन बैठकीत राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. या बैठकीत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये, विद्यापीठाची संकुले व उपपरिसरे तसेच इतर संबंधित संस्थांमध्ये पदवी, पदविका, पदव्युत्तर आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या पात्र नियमित विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारू नये, अशा सूचना देण्यात आल्या. त्यानुसार हिवाळी-२०२६ अर्थात नोव्हेंबर-डिसेंबर २०२६ मध्ये होणाऱ्या पदवी, पदविका तसेच पदव्युत्तर, व्यावसायिक व अव्यावसायिक नियमित अभ्यासक्रमांच्या परीक्षांसाठी दुष्काळग्रस्त तालुक्यातील पात्र विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारले जाणार नाही. यासाठी संबंधित विद्यार्थ्यांची माहिती विद्यापीठाने निर्धारित केलेल्या नमुन्यात महाविद्यालयांनी सादर करणे आवश्यक आहे. या सवलतीसाठी विद्यार्थ्यांनी दुष्काळग्रस्त तालुक्यातील रहिवासी असल्याचा पुरावा तसेच कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांपर्यंत असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच संबंधित विद्यार्थ्याने इतर कोणत्याही शासकीय शैक्षणिक सवलतीतून परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती घेतलेली नसल्याची खात्री करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांकडून सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांची महाविद्यालयीन स्तरावर छाननी व पडताळणी करण्यात येणार असून, पात्र विद्यार्थ्यांनाच परीक्षा शुल्क माफीची सवलत मिळणार आहे.

# ज्ञानेश कुमार हटवा;दिल्लीत इंडिया आघाडीचा हल्लाबोल

## राहुल गांधींसह अनेक खासदार पोलीसांच्या ताब्यात

नवी दिल्ली:मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी इंडिया आघाडीच्या खासदारांनी मंगळवारी (६ ऑक्टोबर) केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मुख्यालयावर मोर्चा काढला. मात्र, आयोगाच्या मुख्यालयापासून सुमारे १०० मीटर अंतरावर दिल्ली पोलिसांनी बॅरिकेड्स लावून मोर्चा रोखला. त्यामुळे संतप्त झालेल्या विरोधी खासदारांनी रस्त्यावरच ठिय्या



आंदोलन सुरू केले. यावेळी राहुल गांधी यांनी हातात तिरंगा घेत बॅरिकेडवर चढून आंदोलनाचे नेतृत्व केले. त्यानंतर पोलिसांनी राहुल गांधींसह अनेक खासदारांना ताब्यात घेतले.

इंडिया आघाडीच्या खासदारांच्या मोर्चाला सकाळी सुमारे ११ वाजता सुरुवात झाली. काँग्रेसच्या खा.प्रियंका गांधी, राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरदचंद्र पवार) खा.सुप्रिया सुळे यांच्यासह महिला खासदार मोर्चाच्या अग्रभागी होत्या. त्यांच्या मागे इंडिया आघाडीतील विविध पक्षांचे खासदार सहभागी झाले होते. हातात तिरंगा आणि विविध मागण्यांचे फलक घेत खासदारांनी निवडणूक आयोगाच्या मुख्यालयाच्या दिशेने कूच केली. मोर्चा आयोगाच्या कार्यालयाजवळ पोहोचताच दिल्ली पान ४ वर

# एमपीएससी अध्यक्ष विवेक भीमनवार यांचा राजीनामा?

## मुख्यमंत्र्यांकडे पाठविल्याचा रोहित पवारांचा दावा

पुणे:महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे (एमपीएससी) अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी आपल्या पदाचा राजीनामा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठविल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी मंगळवारी केला. एमपीएससीच्या कारभारा विरोधात पुण्यात विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू असतानाच पवार यांच्या या दाव्यामुळे या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे.



पुण्यात एमपीएससीच्या विद्यार्थ्यांची तीन ठिकाणी आंदोलने सुरू असून, एस. एम. जोशी पुलाजवळील आंदोलनाचे नेतृत्व रोहित पवार करीत आहेत. अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी पदाचा राजीनामा द्यावा, ही आंदोलक विद्यार्थ्यांची प्रमुख मागणी आहे.माध्यमांशी बोलताना रोहित पवार यांनी सांगितले की, रविवारी (४ ऑक्टोबर) सायंकाळी साडेसात ते आठ वाजण्याच्या सुमारास विवेक भीमनवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आपला राजीनामा पाठविला आहे. मात्र, राजीनामा मुख्यमंत्र्यांकडे पान ४ वर

# पैनगंगेच्या काठाने वाघाची एन्ट्री;शनिवारपेठ परिसरात बैलाची केली शिकार

## वनविभागाची दवंडी,शेतकऱ्यांत सतर्कता

बी.एल.कागणे

किनवट - पैनगंगा अभयारण्यातील खरबी वनपरिक्षेत्रातील पट्टेदार वाघाचा चुकून बोधडी बु. वनपरिक्षेत्राच्या हद्दीतील दरसांगवी, शनिवारपेठ परिसरात शिरकाव झाला असून शनिवारपेठ शिवारात एका गोऱ्याला शिकार केल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांनी सजग राहण्यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून वनविभागाने दवंडी दिल्याचे सुत्रांनी सांगितले. पैनगंगेच्या भूलजा पेंडावरुन या परिसरात शिरकाव झाल्याचा अनुमान लावण्यात आला आहे. खरबी वन्यजीव आणि बोधडी वनविभागाच्या संयुक्त पथकाने घटनास्थळी ट्रॅप कॅमेरे लाऊन खातरजमा केल्याचे वृत्त आहे.

१ ऑक्टोबर २०२६ रोजी शनिवारपेठ येथील संजय स्वामी नामक शेतकऱ्याच्या कार्ला शिवारातील शेतात बैलावर हल्ला करून ठार केले. तदोपरांत बोधडी वनविभागाला त्याची खबर दिली. बोधडी वनविभागाने खरबी वन्यजीव विभागाला पाचारण केले. या दोन्ही प्रशासनाने जायमोक्यावर जाऊन पंचनाम्यासह मृत बैलाचे प्रशासकीय सोपस्कार पूर्ण करून मृतदेह गाडून टाकला, कारण त्या मृतदेहावर विषप्रयोग करून या वाघाच्या जीवाला धोका होणार नाही याची खबरदारी घेण्यात आली होती. वाघ की, बिबट याची खातरजमा करण्यासाठी ट्रॅपकॅमेऱ्यांचा सुद्धा अवलंब केल्यानंतर बिबट नसल्याची आणि वाघ असल्याची खातरजमा झाली आणि त्यानंतर मात्र भूलजा, मदनापूर, शनिवारपेठ, दरसांगवी, दाभाडीसह परिसरात शेतकऱ्यांना सजग राहण्यासाठी दवंडी दिल्याचे सांगितले. शेतकऱ्यांनी रात्री अपरात्री शेतात एकट्याने



जाऊ नये, पशुधन मोकळे सोडू नये तसेच शेतातील पशुधनावरही कटाक्षाने लक्ष देणे काळाची गरज असल्याचे सांगितले. वाघ, बिबटासारखे हिंस्त्रवन्यप्राणी दिसल्यास त्यांच्या जवळ जाण्याचा किंवा त्याचा पाठलाग करण्याचा प्रयत्न करू नये. वनविभागाला वेळीच कळविण्याचे प्रशासनाने आवाहन केले आहे. त्यानंतर मात्र घटना पान ४ वर

## हरमनप्रीत कौरचा कर्णधारपदाचा राजीनामा



नवी दिल्ली:भारतीय महिला क्रिकेट संघाची अनुभवी खेळाडू हरमनप्रीत कौर हिने तिन्ही प्रकारच्या क्रिकेटच्या कर्णधारपदाचा राजीनामा जाहीर केला. नुकत्याच झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत तिच्या नेतृत्वाखाली भारताने सुवर्णपदक पटकावले होते. त्यानंतर तिने हा निर्णय घेतल्याने पान ४ वर

# चौकशी तर कराच;पण आधी जबाबदारी ठरवा!

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग अर्थात एमपीएससीच्या कारभाराविरोधात पुण्यात विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे. परीक्षा प्रक्रियेतील कथित गैरप्रकार, पेपरफुटी आणि आयोगाच्या कामकाजावरील विश्वासाचा प्रश्न यामुळे विद्यार्थी रस्त्यावर उतरले आहेत. एमपीएससीच्या अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणीही त्यांनी लावून धरली आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपालांकडे एमपीएससीच्या अध्यक्ष व सदस्यांच्या कारभाराची चौकशी करण्याची शिफारस केली आहे. चौकशी झालीच पाहिजे; दोषी आढळल्यास कारवाईही झाली पाहिजे. मात्र या सगळ्यात एक मूलभूत प्रश्न अनुत्तरित राहतो, चौकशी करण्याआधी नैतिक आणि प्रशासकीय जबाबदारी निश्चित करण्याचे धाडस सरकार दाखवणार आहे का? औषध निरीक्षक पदाच्या निवड प्रक्रियेतील पेपरफुटीच्या प्रकरणाने एमपीएससीच्या विश्वासार्हतेला मोठा धक्का बसला. सुरुवातीला असा प्रकार घडल्याचेच नाकारले गेल्याचा विद्यार्थ्यांचा आक्षेप आहे. पुढे प्रकरण गंभीर झाले, गुन्हे दाखल झाले आणि एमपीएससीच्या सचिवांची बदली करण्यात आली. मात्र अध्यक्ष पदावर कायम राहिले. यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात असंतोष निर्माण झाला. प्रश्न साधा आहे, संस्थेच्या प्रशासकीय यंत्रणेवर कारवाई झाली, तर संस्थेच्या सर्वोच्च पदावरील व्यक्तीची जबाबदारी नेमकी कुठे ठरते? याचा अर्थ अध्यक्ष दोषी आहेत, असा निष्कर्ष काढणे नव्हे. कायदेशीर दोष सिद्ध होण्याआधी कोणालाही दोषी ठरवता येत नाही. पण सार्वजनिक संस्थेचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीची नैतिक जबाबदारी हा स्वतंत्र विषय आहे. एखाद्या संस्थेच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आणि त्या संस्थेवरील विद्यार्थ्यांचा विश्वास डळमळीत झाला, तर त्या संस्थेच्या प्रमुखाने परिस्थितीची नैतिक जबाबदारी स्वीकारावी का, हा प्रश्न उपस्थित होणारच. नैतिक जबाबदारी ठरविण्यासाठी न्यायालयाच्या निकालाची प्रतीक्षा करावी लागत नाही.एमपीएससीच्या अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती राज्य मंत्रिमंडळाच्या शिफारशीनंतर राज्यपालांकडून केली जाते. त्यामुळे आज निर्माण झालेल्या परिस्थितीकडे सरकार केवळ आयोगाची अंतर्गत बाब म्हणून पाहू शकत नाही. नियुक्ती प्रक्रियेत सरकारची भूमिका असेल, तर संस्थेवरील विश्वास पुनर्स्थापित करण्याची नैतिक जबाबदारीही सरकारची आहे. चौकशीची शिफारस करून सरकारने आपली भूमिका संपवू नये. चौकशी ही सत्य शोधण्याची प्रक्रिया आहे; जबाबदारीपासून सुटका करून घेण्याचा मार्ग नाही.याहून दुर्दैवी बाब म्हणजे विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला राजकीय रंग देण्याची धडपड सुरू झाली आहे. आंदोलकांना 'अर्बन नक्षलवादी' ठरवले जात असल्याचे आरोप होत आहेत. आंदोलनाला मुस्लिम किंवा कम्युनिस्टांचा पाठिंबा असल्याचे दावे केले जात आहेत. भाजपच्या काही नेत्यांकडून आंदोलनात सहभागी विद्यार्थ्यांचा संबंध राष्ट्रवादी काँग्रेसचे आ.रोहित पवार यांच्याशी जोडला जात आहे. आंदोलनाला विविध राजकीय नेत्यांचा पाठिंबा मिळाला, हे वेगळे वास्तव असू शकते; परंतु त्यावरून आंदोलनातील प्रत्येक विद्यार्थी एखाद्या पक्षाचा कार्यकर्ता ठरत नाही.हा सगळा प्रकार मूळ मुद्द्यापासून लक्ष विचलित करणारा ठरू शकतो. विद्यार्थी कोणाच्या संपर्कात आहेत, यापेक्षा ते रस्त्यावर का उतरले आहेत, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. समजा एखादा राजकीय नेता आंदोलनस्थळी गेला, त्याने विद्यार्थ्यांना पाठिंबा दिला, तरी त्यामुळे पेपरफुटीचा प्रश्न संपतो का? परीक्षा प्रक्रियेतील त्रुटी दूर होतात का? एमपीएससीवरील विश्वास आपोआप परत येतो का? या प्रश्नांची उत्तरे राजकीय आरोपांत नाहीत.आंदोलन करणाऱ्या तरुणांच्या मागण्या चुकीच्या असतील तर सरकारने त्या तथ्यांच्या आधारे फेटाळाव्यात. परंतु प्रश्न गंभीर असतील तर आंदोलकांच्या माथी लेबले मारून त्यांची विश्वासार्हता संपवण्याचा प्रयत्न करणे योग्य नाही. प्रश्न विचारणाऱ्या विद्यार्थ्यांची ओळख शोधण्यापेक्षा त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधणे ही लोकशाहीतील सरकारची खरी कसोटी आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे या परिस्थितीत स्पष्ट आणि नैतिक भूमिका घेण्याची संधी आहे. चौकशीला पूर्ण सहकार्य करावे, ती निष्पक्ष आणि वेळबद्ध असावी आणि दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी. त्याचबरोबर एमपीएससी अध्यक्षांनी संस्थेवरील विश्वास कायम ठेवण्यासाठी नैतिकतेच्या आधारावर पदाचा राजीनामा द्यावा, असे आवाहन सरकार करू शकते. हा राजीनामा दोषसिद्धीचा निर्णय ठरणार नाही; उलट चौकशी निष्पक्षपणे होण्यासाठी आणि संस्थेची प्रतिष्ठा जपण्यासाठी तो नैतिक पाऊल ठरू शकतो.विद्यार्थ्यांना कोणत्याही पक्षाचे समर्थन नको आहे; त्यांना त्यांच्या मेहनतीवर विश्वास ठेवता येईल अशी परीक्षा व्यवस्था हवी आहे. वर्षानुवर्षे अभ्यास करून परीक्षा देणाऱ्या तरुणाच्या मनात**

**प्रश्नपत्रिका सुरक्षित आहे की नाही, निवड प्रक्रिया पारदर्शक आहे की नाही आणि गैरप्रकार झाल्यास जबाबदार व्यक्तीवर कारवाई होईल की नाही, याची खात्री असणे आवश्यक आहे.म्हणूनच सरकारने आता राजकीय आरोपांच्या धुरातून बाहेर पडून मूळ प्रश्नाला भिडावे. चौकशी तर कराच; पण आधी जबाबदारी ठरवा. दोषी कोण, हे चौकशी ठरवेल; पण नैतिक जबाबदारी कोण स्वीकारणार, याचा निर्णय नेतृत्वाला घ्यावा लागेल. एमपीएससी ही लाखो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांची संस्था आहे. तिच्यावरचा विश्वास टिकवण्यासाठी चौकशी आवश्यक आहेच; पण त्याहून आवश्यक आहे ते म्हणजे नीतिमत्ता, पारदर्शकता आणि जबाबदारी स्वीकारण्याचे धैर्य.**

# दुष्काळात तातडीचा आधार,भविष्यासाठी चारा सुरक्षा;राज्यात प्रथमच वैरण विकास धोरण



राज्यातील पशुपालक आणि शेतकऱ्यांसाठी वैरण विकास कार्यक्रम हा केवळ चारा उपलब्धतेचा प्रश्न सोडविणारा उपक्रम न ठरता पशुपालन अर्थव्यवस्थेला स्थैर्य देणारे महत्वाचे पाऊल ठरणार आहे. स्थानिक पातळीवर वर्षभर पुरेसा आणि पौष्टिक चारा उपलब्ध करण्यावर भर दिल्यास पशुपालकांचे बाहेरील चाऱ्यावरचे अवलंबित्व कमी होऊ शकते. शासकीय पडीक, गायरान तसेच उपलब्ध जमिनींचा नियोजनबद्ध वापर करून चारा उत्पादन वाढविणे, सुधारित चारा वाणांना प्रोत्साहन देणे आणि वैरणीच्या झाडांची लागवड वाढविणे यामुळे पशुधनासाठी सातत्यपूर्ण खाद्यसुरक्षा निर्माण होण्यास मदत होईल. त्यातून पशुधनाचे आरोग्य व उत्पादकता टिकून राहण्याबरोबरच दुग्ध व्यवसायाचा खर्च नियंत्रित करण्यास हातभार लागू शकतो. विशेषतः दुष्काळ आणि पावसाच्या अनिश्चिततेच्या काळात चारा टंचाईवर तात्पुरती उपाययोजना करण्याऐवजी दीर्घकालीन व्यवस्था उभारणे, हे या कार्यक्रमाचे सर्वाधिक महत्वाचे वैशिष्ट्य ठरते.

पशुपालन व्यवसायासाठी चारा ही जीवनरेखा आहे. राज्यातील हिरव्या व सुक्या चाऱ्यातील तूट भरून काढण्यासाठी राज्य सरकारने प्रथमच वैरण विकास धोरण लागू करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. दुष्काळी भागात तातडीने चारा उपलब्ध करून देण्याबरोबरच राज्यासाठी दीर्घकालीन चारा सुरक्षा निर्माण करण्याच्या दुहेरी उद्देशाने हे धोरण जाहीर केले आहे. राज्यातील सुमारे २ कोटी ७८ लाख पशुधनासाठी हिरवा आणि सुका चारा पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्यासाठी चारा लागवडीचे क्षेत्र वाढविणे, उपलब्ध चाऱ्याची गुणवत्ता सुधारणे, त्याची योग्य पद्धतीने साठवणूक करणे आणि पर्यायी चारा संसाधनांना चालना देणे, अशा व्यापक उपाययोजनांचा धोरणात समावेश करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी ४९६ कोटी रुपयांच्या आर्थिक तरतुदीचे नियोजन असून, वार्षिक १२ हजार लाभार्थ्यांना रोजगार उपलब्ध होणे अपेक्षित आहे.२०२६ च्या खरीप हंगामात ट्रिगर-१ लागू झालेल्या तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थितीवरील उपाययोजनांसाठी २५ सप्टेंबर २०२६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. त्यामध्ये जनावरांना आवश्यक चारा उपलब्ध करून देण्याच्या उपाययोजनेचाही समावेश आहे.

**चारा तूट कमी करण्यासाठी अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजना**

राज्यातील पशुधन संख्या, उपलब्ध चारा आणि चाऱ्याची तूट विचारात घेऊन उपाययोजना सुचविण्यासाठी २० नोव्हेंबर २०२३ च्या शासन निर्णयानुसार राज्यस्तरीय कृती दल स्थापन करण्यात आले होते. या कृती दलाने चारा टंचाई दूर करण्यासाठी अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजनांची शिफारस केली आहे.राज्यात सुमारे २ कोटी ७८ लाख पशुधन आहे. या पशुधनासाठी १ हजार १७६.७८ लाख मेट्रिक टन हिरव्या चाऱ्याची गरज असताना ९०७.४९ लाख मेट्रिक टन चारा उपलब्ध आहे. हिरव्या चाऱ्याची तूट २६८.३७ लाख मेट्रिक टन म्हणजेच २२.७९ टक्के आहे. सुक्या चाऱ्याची गरज ३७७.८७ लाख मेट्रिक टन असून, प्रत्यक्ष उपलब्धता २९६.६२ लाख मेट्रिक टन आहे. त्यामुळे सुक्या चाऱ्याची तूट ८१.०६ लाख मेट्रिक टन म्हणजे २१.४३ टक्के आहे. पशुपालन व्यवसायासाठी चारा हा अत्यावश्यक घटक असल्याने ही तूट भरून काढण्यासाठी अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपायांची आवश्यकता आहे. चारा लागवडीखालील क्षेत्र वाढविण्यासाठी महसूल आणि वन विभागाच्या शासकीय पडीक, गायरान किंवा मुलकी पड जमिनींचा वापर करण्याचा विचार आहे. कुरण आणि गायरान जमिनींमध्ये सुधारित गवत तसेच द्विदल चारा पिकांच्या जातींची लागवड केली जाणार आहे. हॉर्टी-पाश्चर पद्धतीत फळबागांमधील दोन झाडांच्या मोकळ्या जागेत चारा वाणांची लागवड करून दुहेरी उत्पादन घेण्यात येणार आहे. सिल्वी-पाश्चर पद्धतीत पडीक, खडकाळ किंवा डोंगराळ जमिनीवर सुबाभूळ, अंजन आणि शेवगा यांसारख्या चारा देणाऱ्या झाडांसोबत बहुवार्षिक गवताची लागवड केली जाईल.शेतातील बांध, बंधारे, तलावांचे बांध, परसबाग, जलमार्ग तसेच नापीक आणि मशागतीस अयोग्य जमिनींचाही चारा उत्पादनासाठी उपयोग केला जाणार आहे. अशा जागांवर गिनी गवत, सिग्नल गवत आणि स्टायलो गवताची लागवड करण्याचा प्रस्ताव आहे.



पंकजा मुंडे
पशुसंवर्धन मंत्री

**चाऱ्याची पौष्टिकता वाढविण्यावर भर**

उपलब्ध चाऱ्याचे केवळ प्रमाण वाढविण्याबरोबरच त्याची गुणवत्ता आणि पौष्टिक मूल्य सुधारणे हा धोरणाचा महत्वाचा भाग आहे. त्यासाठी मुरघास निर्मिती, चाऱ्यावर युरिया प्रक्रिया, कापूस पिकाच्या टाकाऊ अवशेषांवर ओझोन प्रक्रिया आणि एन्झाइम अर्थात विकर प्रक्रिया अशा तंत्रांचा वापर केला जाणार आहे. कृषी अवशेष आणि कृषी प्रक्रिया उद्योगांमधील उपपदार्थांचा योग्य वापर करून त्यांचे पौष्टिक खाद्यगट्टे व मुरघासामध्ये रूपांतर करण्यात येईल. यामुळे अन्यथा वाया जाणाऱ्या कृषी अवशेषांचा पशुखाद्यासाठी उपयोग होऊन चारा सुरक्षेला बळकटी मिळणार आहे.

**शास्त्रीय साठवणुकीतून टंचाईग्रस्त भागांना पुरवठा**

वैरण विकास धोरणानुसार, उपलब्ध चारा अधिक काळ टिकवून ठेवण्यासाठी शास्त्रीय साठवणुकीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. त्यासाठी हे बेल्स, फीड ब्लॉक, लीफ मिल आणि कडबाकुट्टी या पद्धतींचा अवलंब केला जाईल. चाऱ्याची टिकाऊक्षमता वाढल्याने अतिरिक्त उत्पादनाच्या काळात त्याची साठवणूक करून टंचाईच्या काळात गरजू भागांना पुरवठा करणे शक्य होणार आहे.चारा कापणी, प्रक्रिया, वाहतूक आणि जनावरांना चारा देताना होणारा अपव्यय रोखण्यावरही भर दिला जाणार आहे. योग्य प्रक्रिया व साठवणुकीमुळे उपलब्ध चाऱ्याचा अधिक परिणामकारक वापर करता येणार आहे.पारंपरिक चारा पिकांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी पर्यायी चारा संसाधनांना प्रोत्साहन देण्यात येईल. त्यामध्ये अझोला उत्पादन, हायड्रोपोनिक पद्धतीने चारा निर्मिती आणि काटेविरहित निवडुंगाचा चारा म्हणून वापर यांचा समावेश आहे. कमी जमीन आणि मर्यादित पाण्यामध्ये चारा उपलब्ध करून देण्यासाठी या पर्यायांचा उपयोग होणार आहे.

वैरण ग्राहक सेवा केंद्रांची निर्मिती, सार्वजनिक-खासगी भागीदारीतून चारा विकास, चारा विकास विस्तार उपक्रम आणि संस्थात्मक बियाणे साखळी उभारणे या पूरक उपाययोजनांचाही धोरणात विचार करण्यात आला आहे. सार्वजनिक आणि खासगी क्षेत्राच्या सहकार्याने चारा उत्पादन, प्रक्रिया व उपलब्धतेची व्यवस्था अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न राहणार आहे.

**दुष्काळी भागांसाठी तातडीचा लाभ**

सद्यस्थितीत जाहीर करण्यात आलेल्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी कमी पाण्यात चारा उत्पादन घेण्यावर अल्पकालीन भर दिला जाणार आहे. उपलब्ध चाऱ्याची टिकाऊक्षमता वाढवून त्याची योग्य साठवणूक केल्यास पुढील काळात टंचाईग्रस्त भागांना पुरवठा करणे सुलभ होईल.दीर्घकालीन उपायांमधून पशुपालनासाठी पुरेशा प्रमाणात चारा उपलब्ध करणे, पशुजन्य उत्पादनांमध्ये स्वयंपूर्णता साधणे आणि पशुपालन व्यवसायाला उद्योजकतेचे स्वरूप देण्याचे उद्दिष्ट आहे. मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेतून सुमारे २५ लाख लाभार्थ्यांना लाभ अपेक्षित असून, त्यापैकी वैरण विकास कार्यक्रमातून वार्षिक १२ हजार रोजगार निर्माण करण्याचे नियोजन आहे. पशुपालकांचे उत्पन्न वाढल्याने राज्याच्या अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार आहे.

**विकसित महाराष्ट्र २०४७ शी थेट जोड**

विकसित महाराष्ट्र २०४७ कार्यक्रमामध्ये पीक अवशेष आणि कृषी प्रक्रिया उद्योगांतील उपपदार्थांचा वापर पौष्टिक खाद्यगट्टे व मुरघास निर्मितीसाठी करून चारा सुरक्षा मजबूत करण्याच्या उपाययोजनेचा समावेश आहे. त्याद्वारे दुग्धव्यवसाय आणि पशुपालन या शेतीपूरक व्यवसायांना उद्योजकतेचे स्वरूप देण्याचा उद्देश निश्चित करण्यात आला आहे. राज्यात पशुपालन व्यवसायामध्ये उद्योजकता निर्माण करण्याच्या व्यापक धोरणातून वार्षिक सुमारे २५ लाख लाभार्थ्यांना लाभ देण्याचे नियोजन आहे. त्यासाठी अंदाजे ४ हजार ५०० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद प्रस्तावित आहे. यातील वैरण विकासाशी संबंधित कार्यक्रमासाठी १२ हजार लाभार्थी आणि ४९६ कोटी रुपयांच्या तरतुदीचे नियोजन करण्यात आले आहे.वैरण विकास धोरणाचा सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे चारा टंचाईकडे केवळ आपत्कालीन मदत म्हणून न पाहता चारा उत्पादन, जमीन वापर, गुणवत्तापूर्ण वाण आणि साठवणूक यांचे दीर्घकालीन नियोजन करण्याकडे शासनाचा कल आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत महाराष्ट्र वैरण विकास धोरण जाहीर करण्यात आले असून या ऐतिहासिक निर्णयामुळे राज्यातील पशुधनासाठी आवश्यक चाऱ्याची उपलब्धता अधिक सक्षमपणे उपलब्ध होईल. तसेच पशुपालन आणि दुग्धव्यवसाय या शेतीपूरक व्यवसायांना भक्कम बळ मिळणार असून, ग्रामीण अर्थव्यवस्थेला एक नवी दिशा मिळेल.

# डॉ.प्रवीण पाटील यांच्या हस्ते 'विद्रोह प्रेमाचा' काव्यसंग्रहाचे थाटात प्रकाशन

## कॉ.उज्ज्वला पडलवार यांच्या कवितांना रसिकांची दाद

नांदेड/प्रतिनिधी-विद्रोही विचार, स्त्री-अस्मिता, सामाजिक विषमता आणि प्रेमाच्या विविध छटांचा वेध घेणाऱ्या कॉ. उज्ज्वला पडलवार यांच्या विद्रोह प्रेमाचा या काव्यसंग्रहाचे प्रकाशन नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. प्रवीण पाटील यांच्या हस्ते रविवारी (दि.४) पीपल्स कॉलेज परिसरातील स्नेहनगर येथील मल्टीमीडिया हॉलमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात झाले. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. जगदीश कदम कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. कवी शिवाजी आंबुलगेकर आणि ज्येष्ठ कामगार नेते कॉ. विजय गाभणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

प्रकाशनानंतर बोलताना डॉ. प्रवीण पाटील यांनी विद्रोही कार्यकर्ती ते कवयित्री असा कॉ. उज्ज्वला पडलवार यांचा प्रवास कौतुकास्पद असल्याचे सांगितले. त्यांच्या कवितांमधून चळवळीची स्फूर्ती आणि सामाजिक बांधिलकी निश्चितपणे जाणवते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आजच्या धावपळीच्या जीवनात माणसांमधील एकाकीपणा वाढत असताना सुशिक्षित समाजातही जात-पात आणि धर्माच्या भिंती बळावत आहेत. या पार्श्वभूमीवर पडलवार यांनी संकुचित मानसिकतेवर तसेच शोषितांच्या प्रश्नांवर संवेदनशीलपणे भाष्य केले आहे, असे ते म्हणाले. संग्रहातील तू सोबत असताना या कवितेवर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) साहाय्याने तयार करण्यात आलेले गीत कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. कविता गीताच्या माध्यमातून अधिक व्यापक श्रोत्यांपर्यंत पोहोचू शकते, असे डॉ. पाटील यांनी सांगितले. गीत सादर होताच उपस्थित रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.अध्यक्षीय भाषणात डॉ. जगदीश कदम यांनी प्रेमाला विद्रोहाची किनार लाभली की व्यक्तिगत भावनेपलीकडे जाऊन सामाजिक विसंगतींवर भाष्य करणारे साहित्य निर्माण होते, असे सांगितले. पडलवार यांच्या कवितेतील प्रेम हे केवळ आत्मसमर्पण करणारे नसून स्वत्वाचा शोध घेणारे आणि अन्यायाविरुद्ध प्रश्न उपस्थित करणारे आहे. पुरुषप्रधान संस्कृतीच्या चौकटींना छेद देत स्त्रीची संवेदना, अस्मिता आणि अस्तित्वाचा बुलंद स्वर या कवितांमधून उमटतो, असेही त्यांनी नमूद केले. कवी शिवाजी आंबुलगेकर यांनी स्त्री-पुरुष विषमतेवर संग्रहातून परखड



भाष्य झाले असून प्रेम आणि विद्रोह हे एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याचे सांगितले. कवयित्री उज्ज्वला पडलवार यांनी साहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून समाजाच्या जखमांवर बोट ठेवून नव्या जाणिवांची पेरणी करणारे प्रभावी माध्यम असावे, या भूमिकेतून या कवितांचा जन्म झाल्याचे सांगितले. संग्रहातील मीच माझी ढाल, आरक्षण, समुद्र, पालवी, विषमतेची दरी, वाट, लोकशाही आणि घाबरू नकोस बये या कविता लक्षवेधी आहेत. स्त्रीला सातत्याने तडजोड शिकवणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध तिच्या स्वत्वाचा आवाज मीच माझी ढाल या कवितेतून व्यक्त होतो, तर लोकशाही कविता सोयीनुसार लोकशाही जोपासण्याच्या प्रवृत्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करते. संग्रहातील काही प्रेमकविता निःस्वार्थ प्रेमाची अनुभूती देतात. पत्रकार भारत दाढेल यांनी कवितांवर आधारित रेखाटलेली व्यंगचित्रे संग्रहाचे वेगळेपण अधोरेखित करतात.

यावेळी प्राचार्य डॉ.लक्ष्मण शिंदे, डॉ.रेखा चव्हाण, डॉ.विठ्ठल पावडे, डॉ.एकनाथ मोरे, नांदेड एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव व नांदेड वार्ताचे संपादक ॲड.कॉ. प्रदीप नागापूरकर, डॉ.किरण चिद्रावार, डॉ. बालाजी कोम्पलवार, ॲड. विजयकुमार रानवळकर, भगवान अंजनीकर, डॉ. राम वाघमारे, प्रा. डॉ. भगवान सूर्यवंशी, कॉ. गंगाधर गायकवाड, डॉ. आदिनाथ इंगोले, प्रा. शरद वाघमारे यांच्यासह साहित्यिक, प्राध्यापक, सामाजिक कार्यकर्ते आणि साहित्यरसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. डॉ. विजया दाढेल यांनी प्रास्ताविक केले, तर राम तरटे यांनी सूत्रसंचालन केले. आभारप्रदर्शन डॉ. भगवान सूर्यवंशी यांनी केले.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# अनधिकृत पाणी उपशाविरोधात प्रशासनाची धडक कारवाई

## ५१ डेपोचे वीज कनेक्शन खंडित;२१५ अनधिकृत मोटारींचे कनेक्शन तोडले

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरासह गोदावरी नदीकाठावरील गावांना भविष्यात पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध व्हावा, तसेच डॉ. शंकरराव चव्हाण विष्णुपुरी जलाशयातील पाणीसाठा पिण्याच्या पाण्यासाठी सुरक्षित राहावा, यासाठी प्रशासनाने अनधिकृत पाणी उपशाविरोधात धडक मोहीम सुरू केली आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या आदेशानुसार आणि तहसीलदार संजय वारकड यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

दुष्काळसदृश परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पाण्याचा अनधिकृत वापर व अपव्यय रोखण्यासाठी महसूल, पोलीस व संबंधित विभागांच्या संयुक्त पथकांमार्फत विविध ठिकाणी कारवाई करण्यात आली. या कारवाई दरम्यान रहाटी, जैतापूर, सोमेश्वर, पिंपळगाव को., बोरगाव ते., थुगाव, मार्कड, पिंपळगाव निमजी, कल्लाळ, विष्णुपुरी आणि कोटीतीर्थ येथील एकूण ५१ डेपोचे वीज कनेक्शन खंडित करण्यात आले.तसेच विविध ठिकाणी पाणी उपशासाठी वापरण्यात येणाऱ्या २१५ अनधिकृत मोटारींचे कनेक्शनही तोडण्यात आले. या कारवाईमुळे जलाशयातील अनधिकृत पाणी उपसा रोखण्यास मदत होणार असून, उपलब्ध पाणीसाठा पिण्याच्या पाण्यासाठी सुरक्षित ठेवण्याच्या प्रशासनाच्या प्रयत्नांना बळ मिळणार आहे.ही कारवाई महसूल व पोलीस विभागाच्या संयुक्त पथकांमार्फत करण्यात आली. ए.बी. सिंगणवाड यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी श्रीकृष्ण येलमटे, एएसआय रामराव ढोले, मंडळ अधिकारी सय्यद मोहसिन, पोलीस उपनिरीक्षक रामराव केंद्रे तसेच एम. एफ. बागवान यांच्या



पथकाने कारवाई केली.तसेच मंडळ अधिकारी मधुकर फुलवले, पोलीस उपनिरीक्षक गोविंद जाधव यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही या मोहिमेत सहभाग घेतला.नांदेड शहर तसेच गोदावरी नदीकाठावरील गावांमध्ये भविष्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये आणि उपलब्ध पाणीसाठ्याचा काटकसरीने व योग्य पद्धतीने वापर व्हावा, यासाठी अनधिकृत पाणी उपशाविरोधातील कारवाई पुढेही सुरू राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर मिशन परिसरातील पाण्याची पाईपलाईन मुळ पाईपलाईनशी जोडावी

## नगरसेविका दीपाली मोरे यांची मागणी

नांदेड/प्रतिनिधी-वसरणी प्रभाग क्र.१९ मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मिशन परिसरातील वस्त्यांमध्ये बंद असलेली पाण्याची पाईपलाईन मुळ पाईपलाईनशी जोडावी अशी मागणी मागणी नगरसेविका सौ.दीपाली संतोष मोरे यांनी एका निवेदनाद्वारे महापालिका आयुक्त यांच्याकडे केली आहे.

वसरणी प्रभाग क्र.१९ अंतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मिशन परिसरातील नागरी वस्त्यांमध्ये काही वर्षांपूर्वी अंतर्गत पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईन टाकण्यात आल्या आहेत. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या नवीन टाकलेल्या पाईपलाईन मुळ पाईपलाईनशी जोडण्यात आलेल्या नाहीत. प्रशासनाने सदरील वस्त्यांमधील अंतर्गत पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन मुळ पाईपलाईनशी जोडली तर या भागातील पाण्याचा प्रश्न कायमचा मार्गी लागेल. यापूर्वीही या संदर्भात निवेदने दिली आहेत. तसेच महापालिका आयुक्त यांना प्रत्यक्ष भेटूनही सदरील प्रश्न त्यांच्यासमोर मांडण्यात आले. त्यांनी पाणीपुरवठा उपअभियंता प्रकाश कांबळे यांना फोन करुन सदरील काम तात्काळ करण्याच्या सुचना दिल्या होत्या. परंतु उपअभियंता कांबळे यांनी अद्यापपर्यंत ते काम मार्गी लावले नाही. शासनाने दुष्काळ जाहीर केला असून पाण्याचा प्रश्नही निर्माण होत आहे. प्रशासनाने सदरील नागरि वस्त्यांमध्ये पाईपलाईन मुळ पाईपलाईनशी जोडली तर या भागातील नागरिकांचा पाण्याचा प्रश्न मिटू शकेल. सध्या या भागातील नागरिकांना पाण्यासाठी भटकावे लागत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सुचनांकडे दुर्लक्ष करणाऱ्या उपअभियंता प्रकाश कांबळे यांच्या विरुध्द महापालिका आयुक्तांनी तात्काळ कारवाई करावी तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर मिशन परिसरातील नागरी वस्त्यांमध्ये अंतर्गत पाईपलाईन मुळ पाईपलाईनशी जोडावी अशी मागणी नगरसेविका दीपाली मोरे यांनी निवेदनात केली आहे.

# स्वतंत्र वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळाच्या अंमलबजावणीसाठी ९ ऑक्टोबरला जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या सोलापूर येथील बैठकीत ठरल्याप्रमाणे वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी मंत्रिमंडळाने निर्णय घेतलेल्या स्वतंत्र वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळाची अंमलबजावणी करावी या मागणीसाठी ९ ऑक्टोबर रोजी राज्यभर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चे काढण्याचा निर्णय झाला आहे. त्याच धर्तीवर काल नांदेड येथे विसावा उद्यान मधील वृत्तपत्र वितरण सेंटरवर राज्याचे कार्याध्यक्ष बालाजी पवार यांच्या अध्यक्षतेखाली व चंद्रकांत घाटोळ यांच्या उपस्थितीत गेटमिटींग घेण्यात आली.

नांदेड येथे ९ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.३० वाजता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथून लेकरा-बाळासह लोकशाही व शांततेच्या मार्गाने मोर्चा निघून जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे. या स्वतंत्र वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळाच्या माध्यमातून वृत्तपत्र विक्रेत्यांच्यासह वृत्तपत्र व्यवसायात कार्यरत असणाऱ्या सर्वच कर्मचाऱ्यांसाठी कल्याणकारी योजना राबविण्याची मागणी आहे. यासाठी छपाई माध्यमातील व वेगवेगळ्या मिडीयातील सर्वांनी मोर्चामध्ये सहकुटुंब उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयावर जमल्यानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिल्हाधिकारी यांच्यामार्फत निवेदन सादर केले जाणार आहे. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी १० ऑक्टोबर २०२४ मध्ये जाहीर केलेल्या स्वतंत्र विक्रेता कल्याणकारी मंडळाची तत्काळ अंमलबजावणी करावी. महामंडळाच्या योजना चालवण्यासाठी शासनाने अर्थसंकल्पात पुरेशी आर्थिक तरतूद करावी, विक्रेत्यांसाठी आरोग्य विमा, अपघात विमा आणि निवृत्ती वेतन योजना त्वरित सुरु कराव्यात, राज्यातील सर्व अधिकृत वृत्तपत्र विक्रेत्यांची नोंदणी प्रक्रिया तातडीने सुरु करण्यात यावी यासह इतर मागण्यांचा समावेश आहे. यावेळी गणेश वडगावकर, बाबु जल्देवार, निळकंठ सोनटक्के, संजय गोणे, सत्यनारायण सुर्यवंशी, संदिप कटकमवार, गणेश जुजाराव, नरेश वंगलवार, भागवत गायकवाड, अशोक खुणे, अवधूत पसलवाड, दुर्गा प्रसाद बलगुरी, प्रवीण कुलकर्णी, शशिकांत दामोधर यांच्यासह इतर वृत्तपत्र विक्रेत्यांची उपस्थिती होती.

# जुना कौठा भागातील अनधिकृत बांधकामावर महापालिकेची कारवाई

नांदेड/प्रतिनिधी-जुन्या कौठा भागात मंजूर नकाशा विरुद्ध केलेले अनधिकृत बांधकामावर सोमवारी पोलीस बंदोबस्तात महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने कारवाई केली आहे.

जुना कौठा भागातील गट क्र.०३ मधील प्लॉट क्र.०१ वर मालमत्ताधारक मनोजकुमार मधुसुदन सिंघ यांनी महापालिकेकडून मंजूर करून घेतलेल्या नकाशाच्या पूर्णपणे विरुद्ध जाऊन अनधिकृत बांधकाम केले होते. या बांधकामामुळे केवळ नियमांचे उल्लंघन झाले नव्हते, तर त्यांनी थेट रस्त्यावर अतिक्रमण करून रहदारीचा रस्ता अडवला होता. यामुळे परिसरातील नागरिकांना आणि रहदारीला अडथळा निर्माण झाला होता. या गंभीर अतिक्रमणाची दखल घेत सिडको क्षेत्रीय कार्यालयाच्या सहाय्यक आयुक्तांनी संबंधित मालमत्ताधारकाला महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ५३ आणि ५४ अन्वये यापूर्वीच कायदेशीर नोटिसा बजावल्या होत्या. त्यानंतरही अतिक्रमण न काढल्याने, महापालिकेने दि.३० सप्टेंबर रोजी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम २६० अन्वये अंतिम नोटीस बजावून हे अतिक्रमण स्वतःहून काढून घेण्याचे आदेश दिले होते. मात्र, संबंधित मालमत्ताधारकाने या नोटिसीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत मुदतीत अतिक्रमण काढले नाही. मालमत्ताधारकाने स्वतःहून अतिक्रमण न काढल्यामुळे अखेर दि.५ ऑक्टोबर रोजी महापालिकेच्या अतिक्रमण पथकाने थेट घटनास्थळी धाव घेतली. मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे, पोलीस अधिक्षक निलाभ रोहन, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली व महानगरपालिकेचे उपायुक्त स.अजितपालसिंघ संधु यांच्या नेतृत्वात आणि सहाय्यक आयुक्त रावण सोनसळे, सिडको क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त डॉ.मिर्झा फरहतुल्ला बेग, क्षेत्रिय अधिकारी नागनाथ पतंगे, गौतम कवडे, अतिक्रमण पथकाचे कर्मचारी व पोलीस बंदोबस्ताच्या उपस्थितीत जेसीबीच्या सहाय्याने सदरील अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले.

# मांडव्यात वन्यजीव सप्ताहाचा जागर
# विद्यार्थ्यांनी दिला ‘वन्यजीव वाचवा निसर्ग वाचवा’ संदेश

किनवट/प्रतिनिधी-किनवट वनपरिक्षेत्राच्या वतीने मांडवा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत १ ते ७ ऑक्टोबर दरम्यान वन्यजीव सप्ताह चालू असून विविध स्पर्धा पार पडल्या आहेत. वृक्ष लागवडीसह विविध घेण्यात येऊन मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण सोहळा देखील पार पडला. विद्यार्थी दस्येपासूनच वन आणि वन्यजीवांप्रती अभिरुची निर्माण व्हावी म्हणून या बहूआयामी सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याचे वनपाल मिरा टोम्पे यांनी सांगितले.

नांदेड वन विभागाच्या वतीने उपवनसंरक्षक संदीप चव्हाण, किनवटचे सहायक वनसंरक्षक किरण चव्हाण, वनपरिक्षेत्र अधिकारी धिरज मदने यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिमंडळ किनवट अंतर्गत बीट मांडवा, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा मांडवा येथील शाळेत वन्यजीव सप्ताह निमित्त निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धकांचे दोन गटांमध्ये विभागणी करून विजेत्यांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक काढून विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले. वन्यजीव हे निसर्गाच्या परिसंस्थेतील महत्त्वाचा घटक आहे. वन्यप्राण्यांची शिकार, अवैध वन्यजीव शिकार, जंगलातील आगी, प्लास्टिक व



कचऱ्यामुळे वन्यजीवांना धोका निर्माण होतो. त्यामुळे वन्यजीव वाचवानिसर्ग वाचवा हा संदेश प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. याबाबत मार्गदर्शन करून शाळेत वृक्ष लागवड करून बक्षीस वितरण करण्यात आले.सदर कार्यक्रमास मुख्याध्यापक खान, वनपाल मिरा टोम्पे, पार्वती पारधी वनरक्षक मांडवा, बालाजी एस.भुरके, संघशीला काकडे, सखाराम भुरके, मुकुंद डोईफोडे, राहुल वानखेडे, कविता पवार, विकास गिते, विशाल गुंजकर शाळेतील शिक्षक भरणे व सर्व शिक्षकवृंद कार्यक्रमास उपस्थित होते.

# उस्माननगर शिवारातील जुगार अड्ड्यावर डीआयजीच्या पथकाची धाड

नांदेड/प्रतिनिधी-उस्माननगर शिवारातील सातबारा हॉटेलच्या पाठीमागे सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर रविवारी सायंकाळी पोलीस उपमहानिरिक्षक कार्यालयातील पथकाने धाड टाकुन आठ जणांना अटक केली. आरोपीकडून पाच लाख रुपयांचा ऐवज पोलीसांनी जप्त केला.

उस्माननगर शिवारातील हॉटेल सातबाराच्या पाठीमागील टिनशेडमध्ये अनेक दिवसांपासून जुगार अड्डा सुरु होता. या जुगार अड्ड्यावर जुगार खेळण्यासाठी परिसरातील शौकीन येत असत. या संदर्भात पोलीस उपमहानिरिक्षक कार्यालयाकडे तक्रार करण्यात आली. पोलीस उपमहानिरिक्षक शहाजी उमाप यांच्या आदेशावरुन पोलीसाच्या एका पथकाने रविवारी सायंकाळी जुगार अड्ड्यावर अचानक छापा टाकला. पैसे लावून जुगार खेळत असतांना आठ जणांना पोलीसांनी रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडून १ लाख १९ हजार रुपये रोख, सात मोबाईल, पाच दुचाकी वाहने असा ५ लाख ८९ हजार रुपयांचा ऐवज पोलीसांनी जप्त केला. या प्रकरणी आठ जणांविरुध्द उस्माननगर पोलीस ठाण्यात मुंबई जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कुंडलवाडी येथे ‘आंगण का मिलन’ उपक्रम उत्साहात

कुंडलवाडी/प्रतिनिधी-अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या कार्याचा गौरव तसेच माता व बालकांच्या आरोग्याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने कुंडलवाडी येथे आंगण का मिलन उपक्रम उत्साहात पार पडला. यावेळी अंगणवाडी सेविका व मदतनीस तसेच प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेअंतर्गत गर्भवती महिला व स्तनदा मातांचा सन्मान करण्यात आला. अंगणवाडीतील चिमुकल्या बालकांना फळे व खाऊचे वाटप करून त्यांच्या आनंदात सहभागी झाले.

कार्यक्रमास भाजपा महिला मोर्चाच्या जल्हाध्यक्षा सौ. अनितातार्इ चोंडीकर व नांदेड जिल्हा दक्षिण भाजपा सरचिटणीस लक्ष्मणराव ठक्कूरवार यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई गजानन कोटलावार होत्या. प्रमुख उपस्थितीत उपनगराध्यक्षा सौ. नेहाताई शैलेश न्याकावार व जिल्हाध्यक्ष डॉक्टर सेल डॉ. हानमंतराव लखमपुरे उपस्थित होते.यावेळी सौ.अनिता ताई चोंडीकर यांनी अंगणवाडी सेविका व मदतनीस या बालकांच्या पोषण, आरोग्य आणि सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे सांगितले. सेविका व मदतनीसांच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा सन्मान करणे हा त्यांना प्रोत्साहन देणारा उपक्रम असून, आंगण का मिलनसारखे उपक्रम समाजात सकारात्मक वातावरण निर्माण करतात, असे त्यांनी सांगितले. नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई गजानन कोटलावार यांनी अंगणवाडी सेविका व मदतनीसांच्या कार्याचे कौतुक केले. कुंडलवाडी शहरातील वाढती गरज लक्षात घेऊन नवीन १६ अंगणवाड्यांचा प्रस्ताव जिल्हा महिला बाल विकास विभागा कडे पाठविले असल्याचे सांगितले. या कार्यक्रमास डॉक्टर सेल जिल्हाध्यक्ष डॉ.हाणमंत लखमपुरे, साईनाथ उत्तरवार, गट नेता रमेश इरलावार, नगरसेविका सोनी सब्बनवार, नमिता खुळगे, साईनाथ भोरे, महेश पुपुलवार, दुधलवाड यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते, अगंणवाडी कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्यने उपस्थित होते.

# ऋग्वेद केंद्रे यांची विभागीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड

कंधार/प्रतिनिधी-शालेय जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत १४ वर्षे वयोगटातील तलवारबाजी स्पर्धेत कंधार येथील महात्मा फुले विद्यालयाचा विद्यार्थी ऋग्वेद राजू केंद्रे (वर्ग सहावा) याने उत्कृष्ट कामगिरी करत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय कामगिरीमुळे त्याची विभागीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

दि.५ ऑक्टोबर रोजी तालुका क्रीडा संकुल, सिडको, नांदेड येथे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत ऋग्वेद केंद्रे याने आत्मविश्वासपूर्ण खेळाचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली आणि प्रथम क्रमांक मिळविला. दरम्यान, महात्मा फुले विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारांतही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. अंश अमरकुमार बसवंते याने बुद्धिबळाच्या जिल्हास्तरीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवून विभागस्तरीय स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे. तसेच करण संदीप राठोड (वर्ग आठवा) याने मोठ्या गटातील १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत तालुकास्तरावर यश संपादन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळविली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संत गाडगेबाबा शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डी.एन. केंद्रे, सचिव चेतनभाऊ दौलत केंद्रे, मुख्याध्यापिका सौ. अनुराधा चेतन केंद्रे, कंधारचे गटशिक्षण अधिकारी वसंत मेटकर, शिक्षण विस्तार अधिकारी प्रविण पाटील, केंद्रप्रमुख परमेश्वर सूर्यवंशी तसेच महात्मा फुले प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक दिगांबर वाघमारे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## जाहीर समन्स

नांदेड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधिश,वरिष्ठ स्तर,नांदेड
यांच्या न्यायालयात
(पिठासन अधिकारी श्री.एम.एस.बोराळे)
विशेष दिवाणी दावा क्र.५९६/२०२५
ओमकार कानवते वि.राजु बापूराव कानवते

ओमकार कानवते पि.राजकूमार कानवते वय २० वर्ष धंदा निरंक, रा.कोठारी चिखली ता.किनवट जि.नांदेड

वि.

३. बैरानी अहेमद पि.शमशोदीन वय ५३ वर्ष धंदा शेती रा.किनवट ता.किनवट जि.नांदेड

प्रति,

३. बैरानी अहेमद पि.शमशोदीन वय ५३ वर्ष धंदा शेती रा.किनवट ता.किनवट जि.नांदेड

ज्याअर्थी आपणास जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, वादी याने ओमकार कानवते पि.राजकूमार कानवते रा.कोठारी चिखली ता.किनवट जि.नांदेड दावा या न्यायालयात दाखल केला आहे. सदरील प्रकरणात आपण प्रतिवादी क्र.३ असुन आपल्यावर बऱ्याच वेळा समन्स/नोटीस पाठविण्यात आल्या. परंतु आपण सदरील नोटीस घेण्यास जाणुन बुजून टाळाटाळ करीत आहात. या सदरील पत्यावर मिळूण येत नाहीत असे कोर्टाच्या निदर्शनास आले आहे.

तरी या जाहीर समन्सद्वारे आपणास कळविण्यात येते की, हे समन्स प्रसिध्द झालेल्या तारखेपासून म्हणजेच दिनांक २९/१०/२०२६ रोजी न्यायालयात राहण्यास कसुर केल्यास आपले विरुध्द एकतर्फा दावा निकाली काढण्यात येईल या संबंधी नोंद घ्यावी.

आज दिनांक २४/०९/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी व सहीनिशी दिले.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
२ रे सह दिवाणी न्यायालय,
व.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**(सहाय्यक अधिक्षक)**
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ५ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष पी.ए.खंडारे)
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१५०४/२०२६
पांडुरंग वि.निरंक

अर्जदार : १. पांडुरंग पि.बापुराव कोकाटे, वय : ५८ वर्ष धंदा : मजुरी, रा.दत्तनगर,नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारसा प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. वरील अर्जदार मयत बापुराव पि.सखाराम कोकाटे यांचे वारस आहेत. मयत बापुराव पि.सखाराम कोकाटे यांचे दिनांक २१/०४/२०२६ रोजी मृत्यु झाला आहे. अर्जदाराने अर्जामध्ये नमूद केले आहे की, अर्जदार हा मयताचा मुलगा आहे.

वर नमुद अर्जदाराशिवाय ईतर कोणीही मयताचे कायदेशीर वारसदार नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहे.

तरी, प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दिनांक २०/११/२०२६ रोजी किंवा एक महिन्याच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ०५.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिला.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
५ वे सह दिवाणी न्यायालय,
क.स्तर,नांदेड

''आदेशावरुन''
स्वाक्षरित/-
**सहा.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

# श्री रेणुकादेवी मंदिर सकाळी ५ ते रात्री १० पर्यंत भाविकांसाठी खुले

## सुरक्षेसाठी ३५ अधिकारी,३० कर्मचारी,२५० होमगार्डसह ५०० जणांचा बंदोबस्त



माहूर/प्रतिनिधी-लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री रेणुकादेवी मंदिरातील शारदीय नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमी-वर माहूर प्रशासन सज्ज झाले आहे. यात्रेदरम्यान स्वच्छता, सुरक्षा आणि भाविकांच्या सुविधांमध्ये कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. बॅनरमुळे शहराचे विद्रूपीकरण होणार नाही याची दक्षता घ्यावी, तसेच दिव्यांग भाविकांसाठी डोलीची व्यवस्था करावी, अशा स्पष्ट सूचना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिल्या.

शारदीय नवरात्रोत्सव २०२६ च्या नियोजनाची पूर्वतयारी आढावा बैठक आज मंगळवार (६) श्री रेणुकादेवी गडावर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली झाली. धर्मादाय सहआयुक्त हिरा शेळके, जिल्हा पोलीस अधीक्षक निलभ रोहन, मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, सहाय्यक जिल्हाधिकारी बी. सरवण, अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड, तहसीलदार अभिजित जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी किरण भोंडवे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विविध विभागांच्या यात्रानियोजनाचा विभागनिहाय आढावा घेण्यात आला.राज्य परिवहन महामंडळाकडून यात्रेसाठी १२० बसेसचे नियोजन करण्यात आले असून प्रवासी नियोजन कक्ष तसेच बस दुरुस्तीसाठी २० तांत्रिक कर्मचाऱ्यांची व्यवस्था करण्यात येणार असल्याची माहिती चंद्रशेखर समर्थवाड यांनी दिली. वन विभागाकडून वनपाल व वनरक्षकांची पथके कार्यान्वित करण्यात येणार असल्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित जाधव यांनी सांगितले.

नवरात्रोत्सवापूर्वी धनोडा नदीवरील नवीन पूल सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू असून, शहरातील पथदिवे चार दिवसांत सुरू करण्यात येतील, अशी माहिती राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली. आरोग्य विभागाकडून पाच ठिकाणी पथके तैनात राहणार असून, दहा आरोग्य सहाय्यक, तीन रुग्णवाहिका, वैद्यकीय अधिकारी तसेच आपत्कालीन सेवेसाठी आवश्यक औषधसाठा उपलब्ध ठेवण्यात येणार असल्याचे तालुका वैद्यकीय अधिकारी राजेश माचेवार यांनी सांगितले.यात्रेतील सुरक्षेचा आढावा देताना पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांनी ३५ अधिकारी, ३० पोलीस कर्मचारी, २५० होमगार्ड आणि सात ते आठ पथकांसह सुमारे ५०० सुरक्षा कर्मचारी तैनात राहणार असल्याचे सांगितले.श्री रेणुकादेवी मंदिर प्रशासनाच्या वतीने ५० सुरक्षारक्षक, १६० उत्सव कर्मचारी आणि ३२ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. भाविकांसाठी मंदिर सकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत दर्शनासाठी खुले राहणार असून, सायंकाळी ५ ते ७ या वेळेत व्हीआयपी दर्शनाची व्यवस्था करण्यात आली आहे. वैद्यकीय सेवा, विद्युत व्यवस्था, महाप्रसाद तसेच उन्हापासून भाविकांचा बचाव करण्यासाठी अतिरिक्त मंडपाची व्यवस्था करण्यात येणार असल्याची माहिती व्यवस्थापक विजय राऊत यांनी दिली. नगरपंचायतीच्या वतीने नियंत्रण कक्ष, पार्किंग व्यवस्था, तीन ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छता व्यवस्था आणि अग्निशमन दल कार्यान्वित करण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी विवेक कांदे यांनी सांगितले. भाविकांच्या सोयीसाठी दर्शनासाठी जाण्याचा आणि परतीचा स्वतंत्र मार्ग ठेवण्यात येणार असल्याचे तहसीलदार तथा संस्थानचे कोषाध्यक्ष अभिजित जगताप यांनी सांगितले. यात्रेदरम्यान आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा तसेच अन्न व औषध प्रशासनाकडून तपासणी करण्यात येणार आहे.मालवाडा घाटातील एका बाजूचा रस्ता खोदून ठेवण्यात आल्याने यात्रेपूर्वी त्याची तात्पुरती दुरुस्ती करण्याबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली.या वेळीमान्यवरच्या हस्ते नवरात्र उत्सव कार्यक्रम पत्रिकेचे विमोचन करण्यात आले.यावेळी दत्तशिखर संस्थानचे व्यवस्थापक जी. एन. नाईक, गटविकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस, विश्वस्त चंद्रकांत भोपी, संजय कान्नव, दुर्गादास भोपी, योगेश साबळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी, श्री रेणुकादेवी संस्थानचे विश्वस्त व कर्मचारी, पत्रकार आणि व्यापारी उपस्थित होते.

### गतवर्षीपेक्षा यंदा अधिक सुधारणा करू:जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

जिल्हा प्रशासनाकडून नवरात्र यात्रेच्या नियोजनासाठी दरवर्षी आढावा बैठक घेण्यात येते. यात्रेदरम्यान मोठ्या संख्येने भाविक माहूरमध्ये येत असल्याने त्यांच्या ये-जा करण्यासाठी वाढीव एसटी बसेस, पार्किंग, पिण्याचे पाणी, अखंडित वीजपुरवठा, आरोग्य सुविधा आणि रुग्णवाहिकांची व्यवस्था यावर प्रशासनाचा विशेष भर आहे.गतवर्षीही माहूरची नवरात्र यात्रा चांगल्या पद्धतीने पार पडली होती. यंदा गतवर्षीपेक्षा अधिक सुधारणा करून भाविकांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुविधायुक्त वातावरणात दर्शन मिळावे, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे. यात्रेदरम्यान कोणत्याही विभागाकडून हलगर्जीपणा होणार नाही, याची दक्षता घ्यावी. स्वच्छता आणि भाविकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले.

# बोधडी बु.ग्राम पंचायतीच्या कारभाराची ८ ऑक्टोबरला चौकशी

किनवट/प्रतिनिधी-बोधडी बु. ग्रामपंचायतीच्या विकास निधीत ग्राम पंचायत अधिकाऱ्यांनी केलेल्या भ्रष्टाचार केला असून तक्रारकर्त्यांच्या रेट्यामुळे आज (६ ऑक्टोबर) गटविकास अधिकाऱ्यांनी ८ ऑक्टोबर रोजीचे चौकशीचा मुहूर्त काढला आहे. पंचायत समितीचे विस्तार अधिकारी के.एच.गायकवाड यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.

चौकशी दरम्यान तक्रारीच्या अनुषंगाने सर्व अभिलेखे चौकशी अधिकाऱ्यांना तपासणीसाठी उपलब्ध करून देण्याची ग्राम पंचायत अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्यामुळे दूध का दूध और पानी का पानी निष्पन्न होणार की, विरजन टाकल्या जाणार हे स्पष्ट होणार आहे.मागील पाच वर्षांपासूनचा हा आर्थिक घोटाळा असल्याचे प्रकरण आहे. सार्वजनिक रस्ते, नळयोजना अशा महत्त्वाच्या आणि ज्वलंत मुद्द्यांवर तक्रारकर्त्यांनी बोट ठेवल्यामुळे ग्राम पंचायत अधिकाऱ्यांना कदाचित अडचणीचे ठरू शकते असा अनेकांचा कयास आहे. अंतर्गत रस्ते, पाणी पुरवठा करणारी नळयोजना अशा महत्त्वाच्या विषयावर तक्रारकर्त्या युवा कार्यकर्त्यांनी पाठपुराव्याचे सातत्य कायम ठेवल्याने गटविकास अधिकाऱ्यांना चौकशी टाळता आली नाही. ४१६४/२०२६ क्रमांकाच्या पत्रकान्वये किनवट पंचायत समितीचे विस्तार अधिकारी के.एच. गायकवाड यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. चौकशी दरम्यान सर्वांचे लक्ष बोधडी बु. ग्रामपंचायतीकडे लागणे स्वाभाविक आहे. कारणही तसेच आहे. ग्रामसभेला बगल देणारे ग्राम पंचायत अधिकारी या चौकशीला सामोरे जाणार की दांडी मारणार? यावरही होऊ लागलेली चर्चा ऐकायला मिळते.

# राष्ट्रवादीच्या हक्काच्या जागेवर भाजपचा दावा;तटकरेंची उघड नाराजी

पुणे : पुणे पदवीधर विधानसभा मतदारसंघावर पुन्हा वर्चस्व मिळविण्यासाठी भाजपने महायुतीच्या जागावाटपात धक्कातंत्राचा वापर करत ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसकडून आपल्याकडे घेतली आहे. भाजपने या मतदारसंघातून डॉ. स्मिता योगेश जाधव यांना उमेदवारी दिली असून, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी या निर्णयाबाबत स्पष्टपणे खंत व्यक्त केली आहे.

पुणे पदवीधरची जागा आमच्या हक्काची होती. ती मिळाली नाही, ही वस्तुस्थिती आहे. नक्कीच आम्ही कुठेतरी कमी पडलो. हे आमचे सामूहिक अपयश आहे, अशी कबुली तटकरे यांनी दिली. मागील निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे अरुण लाड या जागेवरून विजयी झाले होते. त्यामुळे ही जागा राष्ट्रवादीला मिळणे अपेक्षित होते, असे त्यांनी स्पष्ट केले. अरुण लाड नंतर इतर राजकीय प्रवाहात गेले असले, तरी मागील निवडणुकीतील मतदान हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या संघटनात्मक ताकदीमुळे झाले होते. त्यामुळे पुणे पदवीधरची जागा राष्ट्रवादीला मिळायला हवी होती, अशी पक्षाची भूमिका असल्याचे तटकरे यांनी सांगितले. जागावाटपाचा अंतिम निर्णय मुख्यमंत्री तसेच दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या स्तरावर झाला आहे. मात्र, ही जागा मिळविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून पुन्हा प्रयत्न केले जाणार आहेत. केंद्रीय नेतृत्वाची सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली भेट घेऊन पुणे पदवीधरची जागा मिळविण्याबाबत चर्चा करण्यात येईल, असेही तटकरे यांनी स्पष्ट केले आहे.

पान १ वरुन

### हरमनप्रीत कौरचा...

क्रिकेटप्रेमींना धक्का बसला आहे. सोशल मीडियावरील भावनिक पोस्टमध्ये हरमनप्रीतने कर्णधार म्हणून केलेले त्याग आणि अनुभव आयुष्यभर सोबत राहतील, असे म्हटले. संघाला नेहमीच वैयक्तिक कामगिरीपेक्षा प्राधान्य दिल्याचेही तिने स्पष्ट केले. सहकारी खेळाडू, प्रशिक्षक, सपोर्ट स्टाफ, बीसीसीआय आणि कुटुंबीयांचे आभार मानताना तिने कर्णधारपदाचा अध्याय संपला, मात्र प्रवास सुरूच राहील असे सांगितले. त्यामुळे खेळाडू म्हणून ती भारतीय संघासाठी योगदान देत राहणार आहे.

# ग्रामरोजगार सेवकांच्या मागण्यांसाठी निवेदन; शासन निर्णयाच्या अंमलबजावणीची मागणी

नांदेड/प्रतिनिधी-ग्रामरोजगार सेवकांच्या विविध प्रलंबित मागण्या तातडीने मान्य करून ३१ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबत विकसित भारत रोजगार व उपजीविका हमी योजना आयुक्तांना निवेदन देण्यात आले.

ग्रामरोजगार सेवकांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासन व प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन त्यांची पूर्तता करावी, तसेच शासन निर्णयानुसार ग्रामरोजगार सेवकांना मिळणारे हक्क व सुविधा लागू कराव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यास विलंब होत असल्याने ग्रामरोजगार सेवकांमध्ये नाराजी असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. प्रलंबित मागण्यांबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन शासन निर्णयाची अंमलबजावणी न केल्यास आगामी काळात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला.यावेळी आयटकचे कॉ. श्यामजी काळे, कॉ. राजू देसले, कॉ. प्रकाश बैलकेवाड यांच्यासह पदाधिकारी व ग्रामरोजगार सेवक उपस्थित होते.



# डी.बी.जगत्पुरिया यांना 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय प्रज्ञा पुरस्कार' जाहीर



छत्रपती संभाजीनगर: विख्यात कवी, समीक्षक आणि ज्येष्ठ पत्रकार डी.बी.जगत्पुरिया यांना जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ, नागपूर तर्फे दिला जाणारा अत्यंत मानाचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय प्रज्ञा पुरस्कार' नुकताच जाहीर झाला आहे.

इंडोनेशियातील बाली येथे येत्या १९ आणि २० नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या जागतिक साहित्य संमेलनात हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, या संमेलनासाठी त्यांना 'मुख्य अतिथी' म्हणूनही निमंत्रित करण्यात आले आहे. या दुहेरी बहुमानाबद्दल साहित्यिक आणि पत्रकारिता क्षेत्रातून डी. बी. जगत्पुरिया यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांनी हा सन्मान अत्यंत नम्रपणे आपले आप्तस्वकीय, मित्र परिवार आणि चाहत्यांना अर्पण केला आहे. डी. बी. जगत्पुरिया यांचे साहित्य क्षेत्रात मोलाचे योगदान आहे. त्यांच्या नावावर मराठी व हिंदी कवितासंग्रह, ५ समीक्षा ग्रंथ, सामाजिक-वैचारिक ग्रंथ, व्यक्तिचित्रे, नाटक आणि एकांकिका अशी सुमारे ३० ते ३२ पुस्तके प्रसिद्ध आहेत. याशिवाय,वे अस्मितादर्श साहित्य संमेलन, अंकुर साहित्य संमेलन आणि इतर अनेक साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले आहे.

# मुखेड तालुक्याचा ट्रिगल वन मध्ये समावेश करण्याची मागणी

मुखेड/प्रतिनिधी-मुखेड तालुक्यामध्ये यावर्षी पावसातील मोठा खंडामुळे दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली असुन खरीब पिकावर त्याचा गंभीर परिणाम झाला आहे. त्यामुळे मुखेड तालुक्याचा ट्रिगल १ मध्ये समावेश करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी शिवसेना शिंदे गटाच्या वतीने करण्यात आली आहे. जिल्हाप्रमुख उमेशभाऊ मुंडे यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार मुखेड यांना निवेदन देण्यात आले.

मुखेड तालुका हा नांदेड जिल्ह्यातील इतर तालुक्याच्या तुलनेत सरासरी पर्जन्यमान अत्यल्प असून हलक्या व डोंगराळ जमिनी, जमिनीची जलधारण क्षमता, तसेच पावसातील मोठ्या खंडामुळे पिकांना आवश्यक ओलावा उपलब्ध झाला नाही परिणामी तालुक्यातील शेतकरी दुष्काळसदृश परिस्थितीला सामोरे जात आहेत. मुखेड तालुक्यातील सद्यस्थिती, प्रत्यक्ष पर्जन्यमान, पावसातील खंड, पिकाची परिस्थिती व उपलब्ध जलस्रोताचा विचार करता मुखेड तालुक्याचा ट्रिगर-१ मध्ये समावेश करणे अत्यावश्यक आहे, तरी मुखेड तालुक्यातील शेतकऱ्याच्या पिकाच्या वस्तुनिष्ठ परिस्थितीचे अवलोकन करून मुखेड तालुका दुष्काळग्रस्त यादीत समावेश करण्या संबंधाने आपल्या स्तरावरून कार्यवाही करावी अशी मागणी तहसीलदार मुखेड यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनावर तालुकाप्रमुख बालाजी पा.कबनूरकर, प्रभाकर पा. तांदळीकर, शंकर पा. नंदगावकर, शंकर पा. जांभळीकर, शंकर चिंतमवाड, विनोद आडेपवार, भीमराव पा. खतगावकर, माजी सरपंच प्रकाश गुजलवार, ज्ञानेश्वर पा. वडगावकर, उध्दव पा. पाळेकर यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

पान १ वरुन

### अपात्रतेपूर्वीच निवडणूक आयोगाचा...

पक्षातील वाद सोडविण्यासाठी वापरता येणारी वैध चाचणी असल्याचा दावा त्यांनी केला. शिवसेना आमदारांच्या अपात्रतेचा प्रश्न आणि पक्षाचे नाव-चिन्ह याबाबतची निवडणूक आयोगाची कार्यवाही स्वतंत्र असल्याचे कौल यांनी स्पष्ट केले. विधानसभा अध्यक्षांच्या निर्णयाला वेळ लागू शकतो आणि त्या निर्णयाविरोधात पुढे न्यायालयीन आव्हानही दिले जाऊ शकते. त्यामुळे अपात्रतेची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निवडणूक आयोगाची कार्यवाही थांबविणे योग्य ठरणार नाही, असा युक्तिवाद त्यांनी केला. दरम्यानच्या काळात निवडणुका आल्यास पक्षाला चिन्हाशिवाय राहावे लागू शकते, असा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. राखीव निवडणूक चिन्ह हे मान्यताप्राप्त राजकीय पक्षाशी जोडलेले असते आणि मतदारांच्या दृष्टीने पक्षाची ओळख निर्माण करण्यात चिन्हाची महत्त्वाची भूमिका असते, पक्षात फूट पडल्यास कोणता गट मूळ राजकीय पक्षाचे प्रतिनिधित्व करतो, हे ठरविण्याची प्रक्रिया निवडणूक आयोगाच्या अधिकारक्षेत्रात येते, असेही त्यांनी स्पष्ट केले. शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाचा हा वाद गेल्या चार वर्षांपासून न्यायालयीन प्रक्रियेत आहे. आजच्या सुनावणीत शिंदे गटाकडून निवडणूक आयोगाच्या अधिकारांचा बचाव करण्यात आल्याने पुढील सुनावणीत न्यायालय या युक्तिवादावर कोणती भूमिका घेते, याकडे महाराष्ट्रातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### ज्ञानेश कुमार हटवा;...

पोलिसांनी बॅरिकेड्स उभारून खासदारांना पुढे जाण्यापासून रोखले. त्यामुळे खासदारांनी रस्त्यावरच बसून ठिय्या आंदोलन सुरू केले. यावेळी निवडणूक आयोगाच्या कारभाराविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. पोलिसांनी आंदोलकांना हटविण्याचा प्रयत्न केला; मात्र खासदारांनी आंदोलन सुरूच ठेवले. दरम्यान, राहुल गांधी यांनी पुढे येत पोलिसांनी उभारलेल्या बॅरिकेडवर चढून हातात तिरंगा घेतला. त्यामुळे आंदोलनाला अधिक तीव्र स्वरूप आले. समाजवादी पक्षाच्या खासदारांनीही यावेळी आक्रमक भूमिका घेतल्याचे पाहायला मिळाले. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दिल्ली पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. त्याचबरोबर अतिरिक्त सुरक्षा दल आणि आंदोलकांना ताब्यात घेण्यासाठी पोलिसांच्या बसही घटनास्थळी आणण्यात आल्या. काही वेळ ठिय्या आंदोलन केल्यानंतर पोलिसांनी आंदोलक खासदारांना ताब्यात घेण्यास सुरुवात केली. राहुल गांधी, प्रियंका गांधी यांच्यासह इंडिया आघाडीतील अनेक खासदारांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे समोर आले. आंदोलनामुळे आयोगाच्या मुख्यालयाच्या परिसरात मोठा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. आंदोलनात सहभागी झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरदचंद्र पवार) खा.सुप्रिया सुळे यांनी विरोधक शांततेच्या मार्गाने आयोगाच्या कार्यालयाकडे जात असताना त्यांना अडवण्यात आल्याचे सांगितले. तर शिवसेना ठाकरे गटाचे खा.संजय राऊत यांनी ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी कायम ठेवली. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या मुद्द्यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमधील संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

पान १ वरुन

### एमपीएससी अध्यक्ष...

पाठविण्याऐवजी तो राज्यपालांकडे देणे अपेक्षित होते, असे पवार म्हणाले. भीमनवार यांनी राजीनामा मुख्यमंत्र्यांकडे पाठवून पुढील निर्णय त्यांच्यावर सोपविला असल्याचे पवार यांनी म्हटले आहे.

### पैनगंगेच्या काठाने वाघाची एन्ट्री;...

घडली नाही ना वाघिण कोणाच्या नजरेस पडली नसल्याने कदाचित चुकून आलेला वाघ परत गेला असावा असे सध्याचे चित्र दिसते. महाराष्ट्र वन मंत्रालयाने अभयारण्यातील वन्यजीव किनवट तालुक्यात शिरकाव करून शेतकऱ्यांचे पाळीव पशूधन शिकार करु नये यासाठी ठोस उपाययोजना करावी. नुकसान भरपाईच्या रक्कमेत वाढ करावी. पैनगंगा किनारी सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे जाळे निर्माण करून अशा वन्यजीवावर लक्ष देणे अत्यंत गरजेचे बनले असल्याचे शेतकऱ्यांनी बोलून दाखवले.

# मतदारांना मतदानासाठी विशेष नैमित्तिक रजा देण्याचे आवाहन

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र विधान परिषदेच्या ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत मतदान होणार आहे. मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी संबंधित खासगी आस्थापना, उद्योग, संस्था व कार्यालयांनी आवश्यक वेळ उपलब्ध करून द्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ मधील कलम १३५ ब नुसार निवडणुकीच्या दिवशी मतदारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्याची तरतूद आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २३ जून २०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीतील मतदारांसाठी विशेष नैमित्तिक रजा जाहीर करण्यात आली आहे. मात्र, खासगी आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या मतदारांना ही विशेष नैमित्तिक रजा लागू नसल्याने, अशा आस्थापनांमध्ये कार्यरत मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी मतदानाच्या दिवशी किमान दोन तासांची विशेष सवलत देण्यात यावी, अशा सूचना संबंधित तहसीलदारांनी खासगी आस्थापनांना देण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. मतदारांना मतदानासाठी आवश्यक वेळ उपलब्ध करून देणे, ही बाब लक्षात घेऊन खासगी आस्थापना, उद्योग, संस्था व कार्यालयांनी आपल्या कर्मचाऱ्यांना मतदानाची संधी उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४